ट्रामा केअर युनिट आष्टी, जि. बीड येथील मुख्य इमारत बांधकामाच्या सुधारित अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः प्रशामा-२०१७/ प्र.क्र.१०१/ आरोग्य-४

मंत्रालय, १० वा मजला, संकूल इमारत,
गोकूळदास तेजपाल रूग्णालय आवार, मुंबई.

तारीख : २३ एप्रिल, २०१९.

वाचा :-

१) **शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक : संकीर्ण-२०१२/प्र.क्र.१४१/ आरोग्य-३, दि.१७.०१.२०१३.**

२) **शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक : प्रशामा-२०१३/प्र.क्र.३३३/ आरोग्य-४, दि.०२.०७.२०१३.**

३) **संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र क्रमांकः संआसे / कक्ष-३ / टे-६ /ट्राकेयुआष्टी सुप्रमा/९४५०-५१/१७, दि.११.०७.२०१७.**

४) **सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई यांचे पत्र क्रमांकः संआसे / कक्ष-३ / टे-६ /ट्राकेयुआष्टीसुप्रमा/१८१७-१८/१८, दि.२७.०२.२०१८.**

५) **सहसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र क्रमांकः संआसे / कक्ष-३ / टे-६ /ट्राकेयु आष्टीसुप्रमा/३८२०-२१/१८, दि.१९.११.२०१८.**

प्रस्तावना :-

आष्टी जिल्हा बीड येथे ट्रामा केअर युनिट स्थापन करण्यास संदर्भाधिन अनुक्रमांक १) येथील दि.१७.०१.२०१३ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. संदर्भाधिन अनुक्रमांक २) येथील दि.०२.०७.२०१३ च्या शासन निर्णयान्वये ट्रामा केअर युनिटच्या मुख्य इमारतीच्या बांधकामासाठी रु.२५०.०० लक्ष इतक्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. संदर्भाधिन अनुक्रमांक ३) ते ५) येथील आरोग्य सेवा संचालनालयाने ट्रामा केअर युनिटच्या मुख्य इमारतीच्या बांधकामाचे रु.४९७.९५ लक्ष सुधारित प्रशासकीय मान्यतेचे अंदाजपत्रक उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, आष्टी यांनी तयार केले असून कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, बीड आणि जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, बीड यांनी साक्षांकित केले आहे. सदरचे अंदाजपत्रक सन २०१६-१७ च्या दरसूचीवर आधारित आहे. प्रस्तुत सुधारित अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

या शासन निर्णयान्वये, आष्टी जिल्हा बीड येथील ट्रामा केअर युनिटच्या मुख्य इमारतीच्या बांधकामासाठी रु.४९७.९४ लक्ष इतक्या सुधारित प्रशासकीय मान्यतेची किंमत खालील प्रमाणे परिगणित करुन प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

गोषवारा

आरोग्य संस्थेचे नाव व (व्याप्ती)	**मूळ प्रशासकीय मान्यता (रु.लाखात)**	**सुधारीत प्रशासकीय मान्यता (रु.लाखात)**	**अधिक्य (रु.लाखात)**	**ठळक कारणे**
आष्टी जिल्हा बीड येथील ट्रामा केअर युनिटच्या मुख्य इमारतीचे बांधकाम (मूळ बाबी) (अ+ब+क)	**२५०.००**	**४९७.९४**	**२४७.९४**	इमारत बांधकाम करण्यासाठी जागा चढ उताराची असल्याने जोता पातळीमध्ये फरक झाला. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, बीड यांच्या मागणी प्रमाणे किंमतीत वाढ झाली आहे.

तुलनात्मक तक्ता

अ.क्र.	**बाब**	**मूळ प्रशासकीय मान्यता (रु.लाखात)**	**सुधारित प्रशासकीय मान्यता (रु.लाखात)**	**फरक (रु.लाखात)**	**अधिक्याची कारणे**
अ	**मूळ बाबी (आकस्मिक खर्चासह)**	२३४.१३	३२०.७३	८६.५९	--
एकूण - अ		**२३४.१३**	**३२०.७३**	**८६.५९**	
ब	**विद्युत**				जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, बीड यांच्या मागणी प्रमाणे अंतर्गत पथदिवे लावल्यामुळे वाढ झाली आहे.
	मूळ बाबी	१५.८६	३१.७६	१५.८९	
एकूण - ब		**१५.८६**	**३१.७६**	**१५.८९**	

क	पाणीपुरवठा				मूळ अंदाजपत्रकामध्ये समावेश नसलेली कामे जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, बीड यांच्या मागणी प्रमाणे केल्यामुळे किंमतीत वाढ झाली आहे.
१	भाववाढ	---	१७.०१	१७.०१	
२	अंतर्गत रस्ते	---	८५.३१	८५.३१	
३	पार्कीग	---	१.३२	१.३२	
४	बाह्य स्वच्छता गृह	---	२१.२४	२१.२४	
५	संरक्षण	---	२०.५५	२०.५५	
एकूण - क		**---**	**१४५.४५**	**१४५.४५**	
एकूण अ+ब+क		**२५०.००**	**४९७.९४**	**२४७.९४**	**९९ टक्के अधिक्य**

२. उपरोक्त सुधारित अंदाजपत्रकाची प्रशासकीय मान्यता खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

<u>अटी व शर्ती</u> :-

१) कामासाठी निविदा मागविण्याआधी सदर कामास सार्वजनिक बांधकाम विभागातील सक्षम अधिकाऱ्यांची तांत्रिक मंजूरी घेणे आवश्यक राहील.

२) सदर कामाची निविदा काढतांना प्रत्येक कामाची स्वतंत्रपणे निविदा न काढता नमूद सर्व कामांसाठी एकत्र एकच निविदा काढण्यात यावी.

३) क्षेत्रिय जागेच्या परिस्थितीनुसार व आरोग्य संस्थांच्या आवश्यकतेनुसार सुधारित अंदाजपत्रकाच्या कामाची किंमत ठरवण्यात आली असून त्या रक्कमेमधून पूर्ण होईल असे पाहावे.

४) सदरचे अंदाजपत्रक सुधारित असल्याने, या कामांच्या सविस्तर अंदाजपत्रकांना तांत्रिक दृष्टया मान्यता आरोग्य खात्याच्या त्या-त्या आरोग्य सेवा मंडळाच्या उप संचालकांच्या सहमतीने तरतूदी अंतिम करण्यात याव्यात.

५) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/प्र.क्र.१७७/तां.क.१, दि.१० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करण्यात यावी. तसेच काम सुरु करण्यापूर्वी जागेच्या मालकी हक्काबाबतची पुर्तता करुन घ्यावी.

३. सदर सुधारित बांधकामांवरील खर्च सन २०१९-२०२० मध्ये उपलब्ध होणाऱ्या "मागणी क्र. एच-८, ४२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०१- नागरी आरोग्य सेवा (वैद्यकीय सहाय्य),११० -रूग्णालये व दवाखाने , (१)(अ)- पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-इमारती, (००) (०१)- मोठी बांधकामे (४२१० ००१४), ५३- मोठी बांधकामे" या लेखाशिर्षाखाली मंजूर करण्यात आलेल्या अनुदानामधून भागविण्यात यावा.

४.	सदर शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २३६/इमा-२, दि.२६.०४.२०१८ अन्वये दर्शविलेल्या सहमतीनुसार आणि वित्त विभागाच्या शा.नि. क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२, दि.१७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्ट भाग-पहिला, उपविभाग-पाच मधील अनुक्रमांक १ परिच्छेद क्र.१३४ नुसार प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

५.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०४१२१४४५०५२२१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pradip M Balkavde

Digitally signed by Pradip M Balkavde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8db6aab31faca2f1a89698a28c94703436c07cda664672d20607766dc59d345b, serialNumber=ed0fa40788bb5c0d7f76b869fa2e5835af215c6a80eae8f70eaf87b0cf68d63f, cn=Pradip M Balkavde
Date: 2019.04.23 16:04:17 +05'30'

(प्र.मो.बलकवडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन,

प्रत,

१. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
२. सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई
३. सहाय्यक संचालक (लेखा व लेखापरिक्षा),आरोग्य सेवा, पुणे.
४. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई/ पुणे.
५. उपसंचालक, आरोग्य सेवा तालूर मंडळ, लातूर.
६. जिल्हा कोषागार अधिकारी, लातूर.
७. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, बीड.
८. सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-२), मंत्रालय, मुंबई.
९. महालेखापाल १ / २, महाराष्ट्र (लेखा व लेखापरिक्षा)/लेखा व अनुज्ञेयता,मुंबई/नागपूर.
१०.विनियम कार्यासन, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११.कार्यासन अधिकारी (अर्थसंकल्प), सा.आ.वि., मंत्रालय, मुंबई.
१२.अवर सचिव (आरोग्य-३), सा.आ.वि., मंत्रालय, मुंबई.
१३.निवडनस्ती (आरोग्य-४).